# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २०/०९/२०२२ (मंगळवार)**

**(दुपार)**

---

### घरफोडी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत विश्वकर्मा कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक १९/०९/२२ चे ०३.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— टिकमचंद मोहनलाल संचेती, वय ६३ वर्ष, रा.वटेघाट ता.हिंगणा जि.नागपूर यांचे विश्वकर्मा कंपनी जवळ, किराणा दुकान असुन दि. १९/०९/२२ चे सकाळी ०६.३० वा. फिर्यादीस पोलीसांचा फोन आला व सांगीतले की, ०३.३० पाहटे दरम्यान 'तुमचे किराणा दुकानाचा दरवाजा तोडुन सामान चोरून नेतांनी आरोपी यास पकडले आहे' त्यामुळे फिर्यादींनी किराणा दुकान जवळ येउन पाहले तीथे दुकानाचा दरवाजा वाकवेला दिसला व सामान दुकानाचा मागे पॅल्सटिक थैलीत भरलेले दिसले दुकानातील सामानाची पाहनी केली आसता किराणा साहित्य असा एकुण कि. ७,००५/—रू. चा मुद्देमाल आरोपी नामे— बलराम रेवाराम पटेल वय २१ वर्ष रा.चितावर पो.रवण ता.जि.बलोदा बाजार भाटापारा छतीसगड, ह.मु.पांजरी हा चोरून नेतांना मिळून आला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार प्रमोद बन्सोड हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील जूनेवाणी ता काटोल येथे दिनांक १९/०९/२२ चे २३.०० वा. ते दिनांक २०/०९/२२ चे ०३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अनिल गंगाधर बारई वय ४१ वर्ष, रा. जूनेवाणी हे जेवन झाल्यानंतर घराचे समोरील दाराला कुलुप लावून पहील्या मजल्यावर झापले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे समोरील दाराचे कुलुप तोडून घरामध्ये प्रवेश केला. यानंतर आरोपीने किचन मधील लोखंडी कपाटातील लॉकर मधील असलेले ६०,०००/—रू. रोख व सोन्या—चांदीचे दागिने किमती १,१५,५००/—रू. असा एकुण कि. १,७५,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि निभोंरकर मो. क्र ९५२७३४७४४३ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. कन्हान**:— अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील खदान नं. ०६ कामठी कॉलरी कन्हान पारशिवनी येथे दिनांक १९/०९/२२ चे १७.०० वा. ते १७.३० वा. दरम्यान ड.ब्लु.सि.एल खदान नं. ६ येथे ब्लॅक डायमंड ग्रांउड जवळील सब एरिया ऑफीस जवळ ठवलेला लोहा रॉड आरोपी नामे— इंद्रजीत सदाब्रीज प्रसाद अंदाजे वय ३० वर्ष, रा.बांधा दफाई खदान नं ६ कन्हान याने प्रतिबंधित क्षेत्रात येवुन १२ एमएम लोखंडी रॉड लांबी ५ फुट वजनी ७ किलो किमती २१०/—रु. प्रमाणे एकुण ५ रॉड असा एकुण कि. १,०५०/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रविकांत रामदास कन्डे, वय ४२ वर्ष, रा. मु. चनकापुर कॉलोनी क्वा नं. २६/११ खापरखेडा कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी विरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल मो.न ९५५२५१७२६८ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. बोरी** :— अंतर्गत आसोली सावंगी येथे दिनांक १६/०९/२२ चे ०३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— गजानन कीसना कोडापे, वय ४० वर्ष, रा. आसोला सावंगी ता. हिंगणा जि. नागपुर हे आपली एमएच—४०—ऐजे—२६३६ क्रमांकाची काळया रंगाची सीबी शाईन मोटरसायकलने चिकन घेण्याकरीता गेले असता परत आल्यावर त्यांना त्यांची मोटरसायकल त्या जागेवर दिसली नाही. त्यांनी आजुबाजूला शोध घेतला असता त्यांना गाडी कोठेही मिळाली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. १५,०००/—रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी विरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नांदुरकर मो.नं. ९९२३२४२५८७ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. जलालखेडा** :— माहे ०८/२२ चे ००/०० चे सुमारास फिर्यादी/पीडिता वय १८ वर्षे ०३ महिने ही अल्पवयीन असतांना आरोपी नामे— सुरज नथ्थुजी नाडेकर वय २५ वर्ष रा. मोहगाव ता. सौंसर जि. छिंदवाडा मध्यप्रदेश याने तिच्या सोबत जबरदस्तीने त्याचे राहते घरी दि. ०४/०४/२२ रोजी शारीरिक संबध केले. त्यामुळे पीडिता हि गर्भवती राहीली. त्यानंतर जुन २०२२ मध्ये नमुद आरोपीने पीडिताचे राहते घरी येवुन जबरीने शारीरिक संबध केले. पीडिता गर्भवती असल्याने तिने दि. १६/०९/२२ रोजी ॲबोर्ट करण्याच्या गोळया घेतल्याने तिच्या पोटा मध्ये दुखत असल्याने दि. १८/०९/२२ रोजी दुपारी १२.०० वा. सुमारास प्राथमिक आरोग्य केंद्र जलालखेडा येथे उपचारकामी आली असता तिथे ॲबोशन झाले. आरोपी नामे— सुरजनथ्थुजी नाडेकर वय २५ वर्ष रा. मोहगाव ता. सौंसर जि छिंदवाडा मध्यप्रदेश यांच्या विरूध्द अप क्र. ३५६/२२ कलम ३७६ ,३७६(२),(एन) भादवि सहक. ४,६ पोक्सो दि. १८/०९/२२ अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे. यातील फिर्यादी ही मेडीकल हॉस्पीटल नागपुर येथे उपचार घेत असता तिने दि. १९/०९/२२ ला पुन्हा आपले बयानात सांगीतले की, आरोपी नामे— ज्ञानेश्वर उर्फ विलास दंडारे वय २२ वर्ष रा. मोवाड ता. नरखेड हा 'माझ्या कॉलेज मध्ये शिकत असुन तो सिनीअर होता, मी गर्भवती असल्याने त्याने मला प्रेगन्सी कीट व गर्भ पाडण्याचे औशध आणुन देतो मला एकदा संबंध करू दे असे म्हणुन माहे ०८/२०२२ मध्ये घरी कोणी नसतांना ज्ञानेश्वर उर्फ विलास हा आला व त्याने गर्भ पाडण्याचे औषध आणुन दिले व माझ्या सोबत बळजबरीने माझी इच्छा नसतांना शारीरिक संबध माझ्या घरी केले' अश्या फिर्यादीच्या बयानावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द अप क ३५७/२०२२ सहकलम ३७६,३७६(२) (एच) भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज चौधरी मो.नं.८९७५७५५९६९ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १६ कि. मी. अंतरावरील वडोदा कुही रोड आबांडी शिवार येथे दिनांक १९/०९/२२ चे १४.०० वा. ते १४.३० वा. सुमारास तुळशीदास काशीनाथ वाकडे(मृतक), वय ४५ वर्ष, रा. आबांडी, ता. कामठी जि. नागपूर हा रोडच्या काठावर उभा होउन आपली गाय चारत असता कुहीकडुन मौदाकडे जानारे अज्ञात दोनचाकी मोटरसायकलचा चालक डबलसीट चालक आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन धडक दिली. या अपघातात यांचा जागीच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार यंगलवार पोस्टे मौदा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४, १३४/१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि सोनेकर मो.क्र ८९७५९२१७७० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**